**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २३/१०/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध स्थानिक गुन्हे शाखेचीकारवाई

दिनांक २२/१०/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभाग येथे पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील वलनी परीसरात सार्वजनिक ठिकाणी काही ईसम अवैधरीत्या सट्टापटीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळवत आहेत त्यावरून सदर पथकाने मिळालेल्या खबरेप्रमाणे जावुन धाड टाकली असता त्याठिकाणी **आरोपी नामे– नामदेव दशरथ खडसे, वय ६५ वर्ष, रा. देहेगाव २) कृष्णा राम, रा. वलनी** हे लोकांकडुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळताना मिळुन आले. आरोपींकडुन नगदी ४२२७/– रु. व सट्टीपट्टी साहित्य असा एकुण ४२३२/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीस जप्त मुद्देमाल व कागदपत्रां सह पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये सहकलम ४९ ठछै गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनातस्थानिक गुन्हे शाखेचे ओमप्रकाश कोकाटे, सपोनि किशोर शेरकी, सफौ विनोद काळे, पोहवा प्रमोद भोयर, नापोशि संजय बरोदीया यांनी केलेली आहे.

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बेला** :–फिर्यादीनामे–यादव प्रभाकर रोगे, वय ३५ वर्ष, रा. आलागोंदी ता. बेला जि. नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बेला येथे अप क्र. २८६/१९ कलम ३०७ भादंवि सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दि. ३१/०८/२०१९ रोजी चे १२.०० वा. दरम्यानयातील **आरोपी नामे–रमेश आंबादास बलकी वय ५० वर्षे रा. आलागोंदी ता.बेला जि.नागपुर ग्रामीण**व फिर्यादी नामे–यादव प्रभाकर रोगे वय ३५ वर्षे रा आलागोंदी ता.बेला जि. नागपुर ग्रामीण व त्याचा भाउ जखमी नामे–अंकुश प्रभाकर रोगे वय ३० वर्षे रा.आलागोंदी हे गावातील चौकात बसले असतांना आरोपी यांने जखमी यास पाहून म्हटले की तु परमात्मा एक सेवकाचा धर्म घेतला आहे असे म्हणून चिडवत होता त्यामुळे जखमी याने त्यास म्हटले की तु मला का चिडवतो असे म्हणुन त्या कारणावरून चिडून एका काडीने आरोपीने जखमीचे पाठीवर मारले जखमी त्याची काडी धरून फेकल्याने आरोपी हा चिडला व त्याने घरी जावून बकरा कापण्याचे सुरी सारखे हत्यार आणुन त्याने अचानक जखमीच्या पोटाच्या डाव्या भागावर मारून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपाससपोनि सतीश मेश्रामयांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा.डीजे –११ एस.एस. नागुर मॅडमयांनी दिनांक २३/१०/२०२४ रोजी वरील नमुद आरोपीस कलम ३०७ भादवि मध्ये ०३ वर्षे सश्रम कारावास व ५,०००/रू दंड,दंड न भरल्यास ०३ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी सायखेडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुनपोहवा अजय सिंग पोस्टे बेला यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर